*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# गांधीजींचे अहिंसेविषयक विचार : एक अभ्यास

**मनोहर सुभाष निकम,** सहायक प्राध्यापक,
छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा, gibudada@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

गांधीजी यांच्याकडून अवलंबण्यात आलेली अहिंसा ही काही इतिहासातली पहिली घटना नव्हती. यापूर्वीही भारताच्या इतिहासात विशेषत: प्राचीन भारतात इ.स.पूर्व सहाव्या शतकात गौतम बुद्ध आणि जैन धर्मांकडून मोठ्या प्रमाणात अहिंसा या तत्वाचा स्वीकार करण्यात आलेला दिसून येतो. इतिहासातील अहिंसा या तत्वाचा वापर उत्पादन साधनातील भौतिक बदल आणि गरज सूचित करतो. अहिंसा या तत्वाकडे मुलभूत तत्वज्ञानाचा उपजत भाग म्हणून नव्हे तर एक तत्कालीन समाजाची गरज आणि त्यावर दिलेला भर दिसतो. जेथे जैन धर्म हा आत्यंतिक अहिंसेकडे वळला त्याचवेळी बौद्ध धर्म हा मध्यममार्ग स्वीकारून व्यवहारी अहिंसा स्वीकारताना दिसतो.

महात्मा गांधीजी यांनी स्वतःच्या आयुष्यात आणि ब्रिटीश सरकार विरुध्द लढा देण्यासाठी अहिंसात्मक मार्गाचा तत्काळ स्वीकार केलेला नाही. अगदी लहान असताना चोरून केले मांसभक्षण असो वा वेळोवेळी व्यक्त केलेला राग असो ते हिंसक रूप धारण करणे मान्य करतात पण त्याचबरोबर तो टाळण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि प्रयोग देखील मोकळेपणाने मांडताना दिसतात. महात्मा गांधी यांनी अहिंसा ह्या तत्वाचा टप्प्याटप्याने आपल्या आयुष्यात स्वीकार केलेला दिसतो. यासाठी मनाची निर्भीडता आणि अतोनात मोठा संयम हा आवश्यक असतो हे त्यांना लक्षांत आले. दक्षिण आफ्रिकेत आणि नंतर भारतात त्यांनी अहिंसा या मार्गाचा वापर करून ब्रिटीश विरोधी प्रचंड लढा उभारलेला दिसतो.

**उद्देश :**

अहिंसा या तत्वाचा गांधीजीनी खोलवर अभ्यास केलेला आपल्याला त्यांच्या एकूण जीवनचरित्रावरून आणि त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांवरून दिसून येईल. अहिंसा हे तत्व त्यांनी काहीप्रसंगी पूर्णपणे त्यागले का ? असाही मोठा प्रश्न उभा केला जातो. सन १९४२ चे चलेजाव आंदोलन आणि करेंगे या मरेंगे या घोषणा त्यांनी अहिंसा या तत्वाकडून फारकत घेतली का ? त्यांनी जनतेच्या रेट्यामुळे आपल्या धोरणात बदल केला का ? निरंतर प्रदीर्घ काळ जो अहिंसात्मक संघर्ष जो दिला त्याला ते कंटाळले होते का? असे अनेक प्रश्न उभे राहतात. या प्रश्नांच्या अनुषंगाने गांधीजींचे अहिसेविषयक विचार अभ्यासाने हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**मर्यादा :**

अहिंसा या तत्वाचा महात्मा गांधीजीनी ब्रिटीशविरोधी संघर्ष देण्यासाठी जो महत्वपूर्ण मार्ग म्हणून वापर केला त्याचा केवळ काही प्रश्नांना डोळ्यासमोर ठेऊन मांडणी या ठिकाणी करावयाची आहे.

**गृहीतके :**

1. महात्मा गांधीजीनी टप्याटप्याने अहिंसा या तत्वाचा विकास केला.
2. सत्याग्रह उभारणीसाठी अहिंसा या तत्वाला पर्यायी मार्ग म्हणून कधीही गांधीजीनी हिंसा स्वीकारली नाही
3. अहिंसा या तत्वासोबत निर्भयता आणि मनाची सक्षमता आवश्यक अट मानण्यात आली.

**विश्लेषण :**

बी.आर.नंदा यांच्या मते, "गांधीजी यांचे विचार आणि कल्पना या त्यांच्या वैयक्तिक अनुभव आणि ते ज्या वातावरणात राहिले त्यावरून तयार झाल्या आहेत." म्हणून त्यांना गांधीजींना प्रेरणा देणाऱ्या घटना समजून घेतल्याशिवाय त्यांचे जीवनचरित्र समजून घेणे अशक्य वाटते.[१]

दक्षिण आफ्रिकेत असताना महात्मा गांधीनी ब्रिटीश कायद्याला विरोध करताना होणाऱ्या यातनांची सर्व संघर्ष करणाऱ्यांना जाणीव करून दिली होती. आणि अशक्य वाटत असल्यास संघर्षासाठी उतरू नये असे सुचविले

होते. त्यांच्या सुरवातीच्या आवाहनाच्या वेळी तर त्यांच्याजवळ या संघर्षाला काय म्हणावे, काय नाव द्यावे हे ठाऊक नव्हते. आंदोलनाचे स्वरूप काहीही असले तरी ते अहिंसकच असणार याच्यावर मात्र ते ठाम होते. त्यांनी आफ्रिकेत आंदोलनास नाव देण्यासाठी 'इंडियन ओपिनियन' मध्ये एक स्पर्धा देखील आयोजित केली होती. ज्यात 'सदाग्रह' हे नाव सुचविण्यात आले होते ज्याला त्यांनी दुरुस्त करून 'सत्याग्रह' असे नाव केले. पण सत्याग्रहाची पूर्ण रचना, कार्यपद्धती हे अनेक वर्षांनी विकसित झाली. [२]

महात्मा गांधीजी यांच्यावर अहिंसक संघर्ष स्वीकारण्यामागील अनेक प्रेरणा राहिल्या आहेत. ज्यात शाळेतील एक कथा जिचा सार होता "वाईटाचा बदल चांगुलपणाने घेणे". तसाच प्रभाव गिरीप्रवचन, टॉलस्टॉय यांची कथा 'वैकुंठ तुझ्या हृदयात' यांनी पडला. १९०८ मधील गांधीजी यांच्यावर पठाण मीर आलम आणि त्याच्या साथीदारांनी केलेला प्रचंड काठ्यांचा हल्ला हा त्यांच्या अहिंसा या तत्वावरील दृढ विश्वास सिद्द करतो. ज्यात वेळीच त्यांना मदत मिळाली नसती तर कदाचित त्यात त्यांचा मृत्यूही ओढवला असता. [३]

यंग इंडिया मध्ये गांधीजी यांनी धार्मिक कट्टरता आणि त्याच्या निवारणाविषयी विस्तृत लिहिले होते. त्यांच्या मते, "जर देशाने त्यांनी सांगितलेला सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला असता तर हिंदू-मुस्लिमात तणाव निर्माण झाला नसता. अहिंसा ही देशाच्या स्वातंत्र्याची चावीच नाही तर धार्मिक शांतीची गुरुकिल्ली आहे." [४] प्रचंड प्रमाणात दंगली झाल्यावर महात्मा गांधीजीनी कठोर उपोषणे केली ज्याला त्या त्या वेळी मोठे यश प्राप्त झालेले दिसते.

वेळोवेळी गांधीजीनी भारतभर फिरून लोकांची मानसिकता अहिंसक सत्याग्रहसाठी तयार करण्याबरोबर, त्यांना आपला कार्यक्रम देखील समजावून सांगितला. महात्मा गांधीजी यांनी व्हाईसरॉय यांना लिहिलेल्या पत्रात आपली सविनय कायदेभंग करण्याची इच्छा आणि योजना जी स्पष्ट केली त्यात त्यांनी संघर्ष करण्याची तयारी करण्यातही ब्रिटीश लोकांबद्दल जोपासलेली सहानुभूती आणि कुठलाही प्रकारे त्यान त्रास न देण्याची भावना आपल्याला त्यांच्या अहिंसा या तत्वाचा सर्वोच्च विकास दाखवते. [५] अहिंसा या तत्वाबद्दल आणि मार्गाबद्दल त्यांना वेड्यात काढले जाईल याची त्यांना पुरेपूर जाणीव होती. पण ब्रिटीश यांना त्रास न देता आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देणारा हाच मार्ग त्यांना योग्य वाटत होता. आवाहनात्मक असला तरी देखील.

अहिंसेचा संबंध हा गांधीजीच्या एकूण संघर्षाच्या बाबतीत विचार केला तर सत्याग्रह आणि निर्भयता यांच्याशी पूर्णपणे एकरूप झालेला दिसतो. याबातीत गांधीजींची मते जाणली तर मोठा प्रकाश या बाबींवर पडतो. जसे "कारण कितीही नुकसान झाले तरी सत्य अजिबात सोडता कामा नये, जीव वाचविण्यासाठी खोटे बोलावे की नाही असले प्रश्न आणू नयेत, बिकट अवस्थेत सत्यवादी मनुष्य सापडला तरी तो त्यातून सुटतो." याचबरोबर "निर्भयतेशिवाय सत्याग्रहाची गाडी एक पाउलसुद्धा पुढे जाऊ शकणार नाही." याचबरोबर " तलवारबहाद्दराला इतका जो इतर खटाटोप करावा लागतो त्याचे कारण भय आहे. निर्भयता आल्यावर तलवार त्या क्षणी गळून पडेल." [६] या गांधीजीनी हिंद-स्वराज्य मध्ये व्यक्त केलेल्या विचारात पूर्णपणे अहिंसाभाव सामावलेला आपल्याला जाणवेल.

गं.बा.सरदार गांधीजी यांच्या सत्य आणि अहिंसा या दोन तत्वांबद्दल मत नोंदविताना लिहितात की, "त्यांनी सत्य आणि अहिंसा ही दोन तत्वे जन्मभर घट्ट धरून ठेवली होती. बाकी सर्व बाबतीत ते काळानुसार बदलण्यास तयार होते." [७] यावरून त्यांच्या जीवनात सत्य आणि अहिंसा याचे अढळ स्थान स्पष्ट होते. जे जीव गेला तरी त्यागण्यास ते तयार झाले नसते. तश्या भूतकाळातील बिकट प्रसंगात देखील त्यांनी हे दाखवून दिलेले दिसते.

१९४७ साली जेव्हा गांधीजीनी देशभर भयंकर दंगली भडकल्या होत्या, कत्तलींचे सत्र जेव्हा थांबत नव्हते. तेव्हा लोकांनी हिसा सोडून अहिंसा स्वीकारावी म्हणून त्यांनी उपोषण सुरु केले होते. तेव्हा हिंदू-मुस्लीम दोन्हीकडच्या दंगलखोर यांनी रांग लावून शस्त्रे खाली ठेवली होती. मोठ्या धार्मिक गटाच्या नेत्यांनी त्यांना शांतता टिकविण्याचे आश्वासन दिले होते. याच काळात लॉर्ड माउंटबॅटन यांनी त्यांची तुलना ५० हजार सैन्याच्या ताकदीशी

केली होती. त्यांच्या विरोधी लिहिणारे दैनिक स्टेट्समन देखील त्यांची स्तुती करण्यापासून स्वतःला रोखू शकले नाही.[८] गांधीजी यांनी लाखो लोकांचे मन केवळ अहिंसेसाठी उपोषणाने वळविले होते.

गांधीजींच्या मृत्यनंतर जेव्हा भारतात तीव्र यादवी पेटली तेव्हा गांधीजी यांनी आयुष्यभर जीवनाचा अविभाज्य भाग बनवलेले, उराशी कायम बाळगलेले अहिंसा हे तत्व पुन्हा एकदा अवलंबण्याचे आवाहन तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांनी आकाशवाणीवरून भारतीय जनतेला केले. [९]

खरेतर गांधीजी यांना अनियंत्रित होणाऱ्या आणि बेभान होऊन हिंसक संघर्षाकडे वळणाऱ्या जनतेपेक्षा नियंत्रित आणि अनुशासित अशा अहिंसक मार्गाने जाणारा संघर्ष उभारायचा होता आणि ज्याद्वारे ते संपूर्ण देशासमोर एक उदाहरण ठेऊ इच्छित होते, ज्यासाठी त्यांनी १९२२ साली बारडोली हे ठिकाण निवडले होते. तसा विचारदेखील त्यांनी व्हाईसरॉय यांना कळविला होता. पण चौरीचौरा येथील हिंसेने त्यांची निराशा झाली. [१०]

१९४२ साली गांधीजी यांनी खरोखर अहिंसा त्यागली होती का ? याचा खोलवर शोध घेतला तर उत्तर नाही असे येते. कारण त्यांनी आपला विचार न बदलता केवळ ब्रिटिश यांना त्यांनी अपराधी अश्या आक्रमकांच्या यादीत टाकले होते. ज्यांच्या विरुध्द आत्मरक्षेसाठी हिंसा करणे योग्य होते. ज्यानुसार त्यांच्या मते "परिस्थिती इतकी बदलली आहे की जनतेला गुलामीचा प्रतिकार करण्यास आता सांगावे." अहिंसेला अधिक मजबूत करताना ते बोलतात की, " सत्याग्रही यांनी मरण्यासाठी बाहेर पडावे, जगण्यासाठी नाही. जेव्हा लोक मरण्यासाठी बाहेर पडतील तेव्हाच देश चांगला राहील. करेंगे या मरेंगे असा संदेश त्यांनी जनतेला दिला.[११]

गांधीजी यांनी नमूद केल्याप्रमाणे रशिया आणि फ्रांस या देशात हिंसक क्रांत्या झाल्याने तेथे खऱ्या लोकशाहीचा उदय झाला नाही. पण त्याचवेळी भारतात शुद्ध साधनांनी क्रांती घडत असल्याने त्यांना भारतात अधिक शुध्द अशा स्वरुपाची लोकशाही येण्याची आशा आणि खात्री वाटत होती. भारतात सत्ताप्राप्तीनंतर येणारा समाजवाद हा सत्य आणि अहिसा या दोन साधनांनी आणण्याचा प्रयत्न करावा हे त्यांचे आव्हान त्यांच्या अहिंसा या तत्वाच्या विचारांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्वपूर्ण ठरते.[१२]

महात्मा गांधीजी यांनी अहिंसेविषयक प्रश्नांना दिलेल्या उत्तरातून त्यांच्या विचारांवर अधिक खोल प्रकाश आपल्याला टाकता येतो. हे प्रश्न आधुनिक काळात भारत शिरत असताना, जागतिक पातळीवर अमेरिकेने जपानवर अनुबॉम्ब हल्ला केल्यानंतर विचारले गेले असल्याने यातून गांधीजी यांचे विचार आजच्या काळातदेखील प्रासंगिक ठरतात. बळावर आधारित असलेल्या एखाद्या आधुनिक राज्याला अंतर्गत तसेच बाह्य विकाराचा सामना करण्यासाठी अहिंसक प्रतिकार करणे शक्य आहे का ? याचे उत्तर गांधीजी देतात की, "बळावर आधारित आधुनिक राज्याला अहिंसकपणे विकाराच्या शक्तींचा प्रतिकार करणे शक्य नाही, मग ते बाह्य किंवा अंतर्गत असो." [१३] गांधीजी यांचे उत्तर व्यावहारिकतेला जोडणारे आणि आंधळी अहिंसा नाकारणारे आहे. म्हणजे त्यांची अहिंसा डोळस होती असे म्हणावे लागते.

दुसरा प्रश्न हा काँग्रेस सरकारला परकीय आक्रमकता किंवा अंतर्गत दंगलींना पूर्णपणे अहिंसक पद्धतीने सामोरे जाणे शक्य होईल का ? असा आहे. ज्याचे उत्तर गांधीजी सकारात्मक देतात. त्यांच्या मते "काँग्रेस सरकारला "परकीय आक्रमकता किंवा अंतर्गत दंगली" ला अहिंसक पद्धतीने सामोरे जाणे नक्कीच शक्य आहे. माझा विश्वास काँग्रेसला पटणार नाही हे अगदी शक्य आहे. काँग्रेसचा राज्याच्या अहिंसेवर विश्वास नाही." [१४] गांधीजी म्हणजे कॉंग्रेसचे अंतिम मत या दृष्टीकोनाला गांधीजी वरील आपल्या उत्तरातून छेद देतात. कॉंग्रेसचा राज्याच्या अहिंसेवर विश्वास नसला तरी गांधीजीचा मात्र त्यांच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे.

गांधीजी यांची अहिसा ही भित्र्या व्यक्तीची अहिसा नव्हती हे ते रशियाबाबत व्यक्त केलेल्या आपल्या मतातून सिद्द करतात . "अहिंसा व्यक्त करण्यासाठी रशियाला तिच्या हिंसाचाराची सर्व शक्ती टाकून द्यावी लागेल. हे खरे आहे की, जे एकेकाळी सशस्त्र सामर्थ्याने प्रबळ होते, त्यांनी आपले विचार बदलले तर ते जगाला आणि पर्यायाने आपल्या विरोधकांनाही आपली अहिंसा अधिक चांगल्या प्रकारे दाखवू शकतील." [१५] जगातील प्रबळ राष्ट्रांकडून अहिंसेची मोठी अपेक्षा गांधीजी व्यक्त करतात. दुर्बल राष्ट्रांकडून नाही.

गांधीजी यांची अहिंसेच्या अणुबॉम्बच्या विनाशाबद्दल असलेली मते खूप महत्वपूर्ण अशी आहेत. त्यांच्या मते, "अणुबॉम्बने मानवजातीला युगानुयुगे टिकून राहिलेल्या उत्कृष्ट भावना नष्ट केल्या आहेत." गांधीजी जपानच्या भूमिकेचा विरोध करतात पण निष्पाप जपानी स्त्री, पुरुष, मुले जी मारली गेली त्याबाबतीत अमेरिकेचा देखील निषेध करतात. अणुबॉम्बने सर्व नीती, नियम गुंडाळून ठेवली याकडे देखील ते आपले लक्ष वेधून घेतात.[१६]

अहिंसा ही वैयक्तिक की सामुहिक याबाबतीत महात्मा गांधीजी यांची मते ठाम होती. त्यांच्या मते, "जी अहिंसा फक्त एक व्यक्ती वापरू शकते तिचा समाजाच्या दृष्टीने फारसा उपयोग होत नाही. माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्याच्या कर्तृत्वाचा उपयोग होण्यासाठी पुरेसा परिश्रम असणारी कोणतीही व्यक्ती साध्य करू शकेल अशी असली पाहिजे."[१७] महात्मा गांधी हे अहिंसेचा निरंतर सराव, संयम हा आयुष्यात महत्वपूर्ण मानतात. त्यांचे अहिंसेबाबतचे विचार हे संकुचितपणा आणि स्वार्थीपणा ओलांडून सामाजिकतेला स्पर्श करण्याचे काम करताना दिसतात.[१]

**निष्कर्ष :-**

महात्मा गांधीजी यांनी आयुष्यभर अहिसा ह्या तत्वाचा पाठपुरावा केला परंतु त्यांची अहिंसा ही आंधळी अहिंसा नव्हती तर भयरहित अहिंसा त्यांना अभिप्रेत होती. संघर्ष कोणताही असो, चळवळीची नावे बदलली मात्र मार्ग त्यांनी अहिंसात्मकच स्वीकारला त्यासाठी ते कधीही हिंसेच्या पर्यायाकडे वळले नाहीत. केवळ बाह्य नाहीतर आत्मिक तयारी ते अहिंसा या तत्वासाठी अत्यावश्यक मानत होते. जागतिक स्तरावर विविध प्रबळ राष्ट्रे यांची भूमिका काय असावी, तत्कालीन कॉग्रेस सरकार यांचे धोरण काय असावे याबद्दल देखील आपले मत व्यक्त करतात. अहिंसा ह्या तत्वाच्या आधुनिक काळातील स्वीकाराचा जटील प्रश्न देखील विविध उदाहरणे आणि विचार व्यक्त करून ते सोडवितात. त्यांच्या सत्य आणि अहिंसेला मरेपर्यंत एकनिष्ठ राहण्याने महात्मा गांधी आणि अहिंसा, अहिसा आणि महात्मा गांधी असा घट्टपणा रुजू झालेला दिसून येतो.

**संदर्भ :**

1. नंदा बी.आर., महात्मा गांधी एक जीवनी, संन्याशी शामू (अनु.), सस्ता साहित्य मंडळ, नवी दिल्ली, १९६५. पृष्ठ क्र. ५
2. कित्ता. पृष्ठ क्र. ७५ ते ७७
3. कित्ता. पृष्ठ क्र. ७८ ते ८१
4. कित्ता. पृष्ठ क्र. १८५ ते १८८
5. कित्ता. पृष्ठ क्र. २११ ते २१५
6. महात्मा गांधी, हिंद-स्वराज्य,गांधी रिसर्च फौंडेशन, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पुनर्मुद्रण – जून २०१८. पृष्ठ क्र. ७६ ते ७७
7. सरदार गंगाधर बाळकृष्ण, गांधी आणि आंबेडकर, सुगावा प्रकाशन,पुणे, सहावी आवृत्ती २०२०, पृष्ठ क्र. ८३
8. गुहा रामचंद्र,गांधीनंतरचा भारत, साठे शारदा (अनु.) मजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, २०१८.पृ क्र.२० ते २१
9. कित्ता. पृष्ठ क्र. २७
10. शुक्ल रामलखन (संपा), आधुनिक भारतका इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २०१६ . कित्ता. पृष्ठ क्र.६६०
11. कित्ता. पृष्ठ क्र. ८३८ ते ८३९
12. आचार्य जावडेकर श.द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०२०. पृष्ठ क्र. ६३४
13. Gandhi M.K., Bandopadhya Sailesh (Edi.), My Non-Violence, Navajivan Publishing House, Ahaedabad, 2012. Page No. 248
14. Ibib., P.248-249
15. Ibib., P.249
16. Ibib., P.251
17. Ibib., P.341